यशाचा PASSWORD | स्त्रियाही करतात बलात्कार? | शिवसेनेचा बिघडला आनंद

सदा अग्रेसर साप्ताहिक

# चित्रलेखा

२६ मार्च २०१२ | ₹१०



## अमिताभची करामत खुशबू गुजरात

महाराष्ट्र अद्यापि ब्रॅण्ड ॲम्बॅसेडरविना का?



# राजकारणात सारेच दिगंबर

■ सागर राजहंस

**जळगावचे अनभिषिक्त सम्राट म्हणून ओळखले जाणारे सुरेश जैन यांच्या अटकेने महाराष्ट्राच्या राजकारणातील बांडगुळांची सद्दी संपण्याचा सिलसिला कायम राहिला आहे.** सुरेश कलमाडी, कृपाशंकर सिंह, कन्हय्यालाल गिडवाणी आणि सुरेश जैन, ही गेल्या काही महिन्यांतील महाराष्ट्राच्या विकासपुरुषांची नामावली पाहिली, तर काय दिसतं? ज्यांनी महाराष्ट्राचं पर्यायाने मराठी माणसांचं शोषण करून माया जमवली, त्यांचे दिवस भरलेत! ही बांडगुळं स्वकर्तृत्वावर मोठी झालेली नाहीत किंवा त्यांचं साम्राज्य कष्टातून उभं राहिलेलं नाही. शरद पवार, बाळासाहेब ठाकरे अशा महाराष्ट्राच्या महानेत्यांच्या कृपाछत्राखालीच त्यांनी स्वतःचा विकास साधला आहे. पप्पू कलानी आणि हितेंद्र ठाकूर यांची साम्राज्यंही मराठी नेत्यांच्या आश्रयाखालीच उभी राहिली आहेत. ही जी काही मंडळी दिसताहेत, ती राज्य किंवा राष्ट्रीय पातळीवर केलेल्या चमकदार कामगिरीमुळे! परंतु थोडं आत जाऊन पाहिलं, तर राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात असे कृपा, गिडवाणी, कलमाडी, जैन दिसतील. राजकीय नेत्यांना हवं ते पुरवून मोठी झालेली मंडळी दिसतील. कुठे ती नसतील, तर पप्पू कलानी किंवा हितेंद्र ठाकूर यांच्याप्रमाणे गुन्हेगारीच्या आधाराने वाढणारे *डॉन* दिसतील. जिल्ह्यातील मंत्री, खासदारांच्या बैठकीबाहेर कार्यकर्त्यांना तासन् तास तिष्ठत बसावं लागतं, त्यावेळी असे बाजारबुणगे थेट आतल्या खोलीपर्यंत घुसताना दिसतात. नेता कोणत्या पक्षाचा आहे, याच्याशी त्यांचं देणंघेणं नसतं. सत्ताधारी तो आपला मानून त्याच्या सेवेसाठी हजर राहून मेवा खाण्यात ही मंडळी पटाईत असतात. याच हितसंबंधांतून ही मंडळी आधी पाठिराखे आणि नंतर थेट राजकारणात उतरतात.

*जळगाव नगरपालिका* आणि त्यानंतर महापालिकेवर १९८५ पासून सुरेश जैन गटाचं वर्चस्व आहे. २६ वर्षांच्या काळात फक्त दोन वर्षांचा अपवाद वगळता २४ वर्षं म्हणजे तब्बल दोन तपं सुरेश जैन यांचं वर्चस्व आहे. प्रारंभीच्या काळात *अपक्ष*, मग *काँग्रेस, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस* अशा सगळ्या पक्षांमध्ये सुरेश जैन यांचा संचार राहिला आहे. जैनच कशाला? वर उल्लेख केलेली जी नामावली आहे, ते सगळेच महापुरुष सगळ्या राजकीय पक्षांमध्ये वावरलेत. आणि वावरले नसले, तरी त्यांचा *दोस्ताना* पक्षीय भिंतींच्या पलीकडे आहे. त्यामुळे *शिवसेने*पासून *काँगेस*पर्यंत कोणत्याही पक्षाचं किंवा त्या पक्षाच्या नेत्याचं त्यांना किंवा नेत्यांना या बांडगुळांचं वावडं नाही. या बांडगुळांनी जी माया गोळा केली आहे, ती इथल्या मराठी माणसांचं शोषण करून, हे विसरून चालत नाही.

नगरपालिका अस्तित्वात असताना झोपडपट्टी निर्मूलनाच्या उद्देशाने शहरातील झोपडपट्टीवासीयांसाठी स्वस्त दरात घरं उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यासाठी *केंद्र सरकारच्या गलिच्छ वस्ती सुधार* कार्यक्रमाचा आधार घेतला गेला. घरकुलं बांधण्यासाठी *हुडको*कडून काही कोटींचं कर्ज घेण्यात आलं. ११ हजार ४२४ घरकुलं बांधण्याचा हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प होता. मर्जीतील ठेकेदारांना घरकुलांचं कंत्राट देऊन मोठ्या प्रमाणावर लाभ मिळवण्यात आला आहे. जैन यांच्या मर्जीतील *खानदेश बिल्डर्स*ला *घरकुल योजने*चं कंत्राट देण्यात आलं. निविदेतील अटींप्रमाणे कंत्राटदाराने योजनेचं काम नऊ महिन्यांत पूर्ण करणं आवश्यक होतं. मात्र अनेक वर्षं उलटून गेली, तरी फक्त तीस टक्केच काम झालं आहे. काम योग्य गतीने आणि योग्य रीतीने न केल्याबद्दल ठेकेदारावर कोणतीही कारवाई केली नाही. त्याला नियमबाह्य मुदतवाढी देण्यात आल्या. शिवाय त्याला आगाऊ रक्कम बिनव्याजी वापरण्यास दिल्याने *जळगाव महापालिका* मात्र कर्जाच्या ओझ्याखाली गुदमरत राहिली. या गैरव्यवहाराच्या चौकशीसाठी शासनाने नेमलेल्या चौकशी समित्यांनी सत्ताधारी लोकांवर ठपका ठेवला; परंतु कारवाई होत नव्हती. २००६मध्ये तत्कालीन महापालिका आयुक्त प्रवीण गेडाम यांनी *घरकुल योजने*त २९ कोटी रुपयांचा गैरव्यवहार झाल्याच्या संशयावरून जळगाव शहर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद केला. त्यामध्ये माजी नगराध्यक्ष, तत्कालीन मुख्याधिकारी, काही पालिका अधिकारी, आजी-माजी नगरसेवक अशा नव्वद जणांना आरोपी करण्यात आलं होतं. गुन्हा दाखल होताच

सगळ्यांनी अटकपूर्व जामिनासाठी न्यायालयात धाव घेतली. न्यायालयाने सर्वांचे अर्ज फेटाळले, तरीही कुणाला अटक झाली नाही. त्यानंतर डझनभर तपास अधिकारी बदलून गेले, परंतु प्रकरण *जैसे थे* राहिलं.

या संपूर्ण काळात सुरेश जैन यांचा वारू उधळतच होता. *शिवसेना-भाजप* युती सरकारमध्ये गृहनिर्माणमंत्री असलेले जैन नंतर आघाडी सरकारमध्ये अन्न व नागरी पुरवठामंत्री बनले. त्यांचं नैतिक धाडस एवढं होतं, की त्यांनी थेट अण्णा हजारे यांनाच आव्हान दिलं होतं. त्यांच्यावर गैरव्यवहारांचे आरोप करून अण्णांनी उपोषण सुरू केलं, तेव्हा अण्णांच्या शेजारी त्यांच्यापेक्षा मोठा मांडव घालून जैनांनी उपोषणाचा *फार्स* केला. असे हे जैन. कुणालाच जुमानत नव्हते. शरद पवार असोत किंवा बाळासाहेब ठाकरे कुणाच्याच नियंत्रणात राहात नव्हते. पवारांना *ठेंगा* दाखवून ठाकरेंच्या कळपात घुसत होते किंवा ठाकरेंना *टाटा* करून पुन्हा पवारांच्या तंबूत येत होते. नेत्यांना आणि पक्षांना आपल्या तालावर नाचवत होते. कोणत्याही पक्षात असले, तरी त्याची बंधनं पाळत नव्हते. आपल्या तालावर पक्षाला नाचवत होते. आणि त्यांचा हा नाच सगळेच मान्य करीत होते, हे विशेष. कारण जळगावमध्ये फक्त जैनांचंच साम्राज्य होतं. कोणत्याही पक्षातून किंवा अपक्ष उभे राहिले तरी जैनच निवडून येणार, हे स्वच्छ होतं. जळगावच्या जनतेचंही आश्चर्य वाटत होतं. पण या जनतेला आतापर्यंत या दादांना धडा शिकवावा किंवा त्यांची मस्ती उतरवावी, असं वाटलं नाही, याचं नवल वाटल्यावाचून राहात नाही.

तर *घरकुल योजने*साठी कर्जाचा पहिला हप्ता मिळाल्यानंतर *खानदेश बिल्डर्सला मोबिलायझेशन ॲडव्हान्स* म्हणून साडेअकरा कोटी रुपये देण्यात आले. ही रक्कम दोन कंपन्यांच्या खात्यांवर आणि नंतर एका व्यक्तीच्या खात्यावर जमा झाल्याचं तपासात आढळून आलं. सुमारे पंधरा वर्षांहून अधिक काळ हे प्रकरण सुरू आहे. याप्रकरणी २००६मध्ये म्हणजे सहा वर्षांपूर्वी गुन्हा नोंद झाला आहे. तरीही पुढे काहीच घडत नव्हतं. दरम्यानच्या काळात राजकीय पातळीवर मोठ्या उलथापालथी सुरू होत्या. विरोधी पक्षनेते एकनाथ खडसे आणि जैन यांच्यातील वाद एकेरीवर आला होता. विधानपरिषदेच्या निवडणुकीत खडसे यांच्या मुलाचा निखिल खडसे याचा जैन यांनी पराभव घडवून आणला होता. आपलेच भाईबंद *राष्ट्रवादी काँग्रेस*चे ईश्वरलाल जैन यांच्या मुलाला अपक्ष उभं केलं आणि *राष्ट्रवादी*सह खडसेंच्या मुलालाही हरवलं. इथे पुन्हा जैन मंडळी सगळ्याच पक्षांत असल्याचं दिसलं. सुरेश जैन *शिवसेने*त, ईश्वरलाल *राष्ट्रवादी*मध्ये आणि त्यांची एक भावजय *काँग्रेस*ची आमदार. आणि फिरून सगळे *भाजप*च्या मानसिकतेचे. राष्ट्रीय आणि पक्षीय एकात्मतेचं असं उदाहरण देशाच्या राजकारणात अन्यत्र क्वचितच पाहायला मिळेल.

*घरकुल घोटाळा* प्रकरणात प्रारंभापासून अपक्ष नगरसेवक नरेंद्र पाटील आणि सामाजिक कार्यकर्ते उल्हास साबळे आवाज उठवत होते.



**'आदर्श घोटाळा' प्रकरणी सीबीआयच्या वकीलाला लाच दिली म्हणून कन्हय्यालाल गिडवाणीला अटक करण्यात आली.**

परंतु त्यांच्या आवाजाला मर्यादा येत होत्या. मुलाच्या पराभवानंतर जैन यांच्याविरोधात खडसे आक्रमक झाले आणि त्यांनी जळगाव पालिकेतील गैरव्यवहाराचा पाठपुरावा नेटाने सुरू केला. त्यानंतर *घरकुल* गैरव्यवहाराचा तपास अपर पोलीस अधीक्षक इशू सिंधू यांच्याकडे सोपवण्यात आला. २८ जानेवारीला त्यांनी माजी नगराध्यक्ष प्रदीप रायसोनी, तत्कालीन मुख्याधिकारी पी.डी.काळे यांच्यासह अन्य काहींना अटक केली आणि त्यातूनच तपास *घरकुल* घोटाळ्याच्या सूत्रधारापर्यंत म्हणजेच सुरेश जैन यांच्यापर्यंत पोहोचला. महाराष्ट्राच्या राजकारणात पैशाच्या बळावर राजकीय नेत्यांना नाचवणारे दादा कायद्याच्या कचाट्यात सापडले. अटकेनंतरही त्यांनी स्वभावाप्रमाणे आकांडतांडव केलं. परंतु तपास अधिकारी इशू सिंधू यांनी त्यांच्या आर्थिक व्यवहारांची माहिती घेऊनच कारवाईचं पाऊल उचललं असल्यामुळे त्यांच्या आकांडतांडवाला फारसं महत्त्व उरलं नाही.

आघाडीच्या मंत्रिमंडळात परिवहन राज्यमंत्री असलेले गुलाबराव देवकर हेही या प्रकरणामध्ये एक संशयित आहेत. परंतु *आपण या प्रकरणात ज्या सह्या केल्या आहेत, त्या सुरेश जैन यांच्या सांगण्यावरूनच केल्या आहेत,* असं सांगून त्यांनी नामानिराळं राहाण्याचा प्रयत्न केला आहे. कायद्याचे हात त्यांच्यापर्यंत पोहोचतात, की सत्ताधारी पक्षात असल्याचा फायदा त्यांना मिळतो, हे पाहावं लागेल.

*काँग्रेस*चे कलमाडी, कृपाशंकर, गिडवाणी असे एकेक नेते भ्रष्टाचाराच्या प्रकरणांमध्ये अडकत असताना *शिवसेने*ला मोठी संधी मिळाली होती. विधिमंडळाच्या अधिवेशनात सरकारला अडचणीत आणण्यासाठी अनेक विषयांबरोबरच भ्रष्टाचाराचा हा मुद्दाही महत्त्वाचा ठरणारा आहे. परंतु अधिवेशनाच्या तोंडावर सुरेश जैन यांना अटक झाल्यामुळे *शिवसेने*च्या आक्रमणातील हवा निघून गेली आहे. जैन यांच्या अटकेनंतर स्थानिक *शिवसेने*ने अटकेच्या निषेधार्थ *जळगाव बंद* करून तोंड फोडून घेतलं. एकीकडे *सुरेश जैन यांना शिवसेना पाठिशी घालणार नाही,* असं उद्धव ठाकरे सांगत होते, त्याचवेळी जळगावात जैन यांच्या समर्थनार्थ *शिवसेने*ने बंद पुकारला आणि त्या बंदचा फज्जा उडाला. *शिवसेने*च्या आव्हानातील हवा काढून घेण्यासाठीची कारवाई म्हणून जैन यांच्या अटकेकडे पाहिलं जात असलं, तरी हरकत नाही. राजकीय आकसाने का होईना, अशा प्रवृत्ती ठेचल्या जात असल्या, तरी काही बिघडत नाही. जैन यांच्या अटकेनंतर ज्येष्ठ कवी **रामदास फुटाणे** यांनी केलेलं भाष्य खूप काही सांगून जातं-

**मंत्री झाले खासदार झाले**
**आमदाराचा नंबर आला**
**जळगावचा श्वेतांबर**
**घरकुलात दिगंबर झाला...**

*हमाम में सब नंगे* असं म्हटलं जातं. आता *राजकारणातही सगळेच दिगंबर* असं म्हणण्याची पाळी आली आहे. ■